ePaper

**पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपीला 12 दिवसांची पोलीस कोठडी**

| वर्ष - 8 । अंक - 224 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- दिल्लीचा मुंबई इंडियन्सवर मोठा विजय
- ऑस्ट्रेलियाचा संघ उपांत्य फेरीत
- ट्रम्पला न्यायालयाकडून धक्का!
- बद्रीनाथ मंदिराजवळ भीषण दुर्घटना


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 1 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## विरोधी पक्षनेतेपद देता का हो? लोटांगण घालायचे बाकी!

# उद्धव ठाकरेंना शिकवला चांगलाच धडा!

## 'उबाठा' गटाची केविलवाणी अवस्था, पुरेसे आमदारच नाहीत!

। मुंबई-पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकीय सारीपटावर सध्या उद्धव ठाकरे गटाची विलक्षण गोची झाली आहे. विरोधी 'महाविकास आघाडी' मध्ये सर्वात जास्त आमदार असून देखील विरोधी पक्षनेतेपद मिळवण्यासाठी पुरेशी संख्या नाही. आता, सत्ताधारी 'महायुती' च्या मर्जीवर त्यांचे भवितव्य ठरणार आहे, त्यासाठी 'घालीन लोटांगण, वंदीन चरण'चा जप सुरू झाला आहे.**



महाराष्ट्रामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी सर्वात मोठा धडा शिकवला तो उद्धव ठाकरे यांच्या गटाला ! २०१९ च्या निवडणुकीमध्ये त्यांची शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी या 'युती' ला स्पष्ट बहुमत मिळाले होते. पण, मुख्यमंत्रीपदाची हाव सुटल्याने त्यावेळी शिवसेनेने भाजपाबरोबरील 'युती' तोडली आणि ज्यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती, त्या दोन्ही काँग्रेसबरोबर आघाडी करून मुख्यमंत्रीपद मिळवले होते. पण जनतेला हे रुचले नव्हते, ते जनतेने मतदानाच्या वेळी स्पष्ट दाखवून दिले ! कालांतराने, शिवसेना फुटली, आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ४० आमदार बाहेर पडले, त्यांनी भाजपा बरोबर 'युती' केली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रातील राजकारणाला ही कलाटणी मिळाल्यानंतर पुढील सर्व दिवस उद्धव ठाकरे गटाने फक्त भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेला लाखोली वाहण्यात घालवले. तिकडे शिंदे यांना शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण ही निशाणी मिळाली, त्यांनी विकास कामांचा धडाका लावला.

### जनतेने सपशेल नाकारले

उद्धव ठाकरे गट मोठ्या आशा बाळगून काँग्रेस आणि शरद पवार गटाबरोबर विधानसभेच्या रिंगणात उतरला. पण, त्यांचे राजकारण न पटलेल्या मतदारांनी त्यांचा सुपडा साफ केला. त्यांची अवस्था इतकी वाईट झाली, की विरोधी पक्षनेतेपद मिळवण्यासाठी आवश्यक असलेली आमदार संख्या कोणालाच मिळाली नाही. सर्वात मोठा बनला तो उबाठा गट!

### अर्थसंकल्पीय अधिवेशनात काय?

आता, अर्थसंकल्पीय अधिवेशन तोंडावर आले असून विरोधी पक्षनेत्याशिवायच हे अधिवेशन पार पडते की काय, अशी अवस्था झाली आहे. उद्धव ठाकरे यांना किमान विरोधीपक्षनेते पद मिळावे, असे वाटते. महाआघाडीत त्यांचाच गट मोठा आहे, हे त्यामागील कारण. त्यासाठी त्यांनी आणि आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गाठ घेऊन त्यांना साकडेही घातले आहे. पण, उबाठा ला धडा शिकवण्याचे फडणवीस आणि एकनाथ शिंदे या दोघांच्याही मनात असल्यामुळे त्यांचा न बोलता 'सूडाचा प्रवास' सुरू आहे. त्यांनी ठरविले तरच विरोधी पक्षनेतेपद मिळू शकते, हे वारंवार मनावर बिंबवले जात आहे. कदाचित, अगदी शेवटच्या टप्प्यात उद्धव ठाकरे यांच्या गटाला मेहेरबानी म्हणून विरोधी पक्षनेतेपद दिले जाऊ शकते, ही चर्चा आज राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### उबाठा गटात मोठी फूट पडू शकते

आज 'मातोश्री' वर उबाठा गटाची महत्त्वपूर्ण बैठक झाली. विरोधी पक्षनेतेपदावर दावा सांगायचा का? याबाबत चर्चा झाली. दावा सांगणार आहोत, असे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगून टाकले. असे जर झाले तर पुन्हा वादाला तोंड फुटणार आहे, हे निश्चित ! आदित्य ठाकरे, भास्कर जाधव आणि सुनील प्रभू या तिघांच्या नावाची याबाबत चर्चा झाली. हे पद आदित्य ठाकरे यांना दिले गेल्यास पुन्हा एकदा उबाठा गटात मोठी फूट पडू शकते आणि मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर या गटाची मोठी परवड होऊन तो अस्तित्वहीन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# ‘ती’ स्वत:हून बसमध्ये गेली!

## आरोपी दत्तात्रय गाडेच्या वकिलांचा दावा; सुनावणीत काय झालं?

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील स्वारगेट बस डेपोमध्ये २६ वर्षीय तरुणीवर घडलेल्या बलात्काराच्या घटनेतील आरोपी दत्तात्रय गाडेला रात्री गुणाट या गावातून अटक करण्यात आली होती. त्यानंतर आज त्याला पुण्यातील सत्र न्यायालयात हजर केले असता १२ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपी दत्तात्रय गाडे याच्यावतीने साजिद शाह आणि वाजिद खान बिडकर या वकिलांनी त्याची बाजू मांडली. सुनावणीनंतर माध्यमांशी बोलत असताना वकिलांनी दत्तात्रय गाडे निर्दोष असल्याचे म्हटले.**



वकील वाजीद खान म्हणाले, “दत्तात्रय गाडे सराईत गुन्हेगार नाही. त्याच्यावर चोरीचे गुन्हे दाखल असून ते सिद्ध झालेले नाहीत. बलात्काराची घटना पहाटे ५.४५ वाजता घडल्याचे म्हटले जाते. ती ओरडू शकली असती, ती प्रतिकार करू शकली असती. पण यात बळजबरीने काही झाले, असे दिसून येत नाही. न्यायालयाने सुनावणी घेतल्यानंतर १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आम्ही १२ मार्च रोजी आरोपीची बाजू मांडू. तसेच आरोपी दत्ता गाडेच्या भावालाही पोलिसांनी ताब्यात घेतलेले आहे. तो हुबेहूब आरोपी गाडेसारखाच दिसतो.”तसेच आरोपीचे दुसरे वकील म्हणाले, “आम्ही आरोपीशी चर्चा केली. त्याला आम्ही सत्य घटना काय आहे? अशी विचारणा केली असता, तो म्हणाला की, बसमध्ये आधी पीडित तरुणी चढली होती. नंतर मी गेलो. आमच्यात जे झाले, ते दोघांच्या संमतीने झाले.” जर संमतीने ती घटना घडली होती तर आरोपीने पळ का काढला? असा प्रश्न यावेळी पत्रकारांनी विचारला असता वकील म्हणाले की, त्याबाबत आम्हाला अद्याप माहिती नाही.“पोलिसांना त्याचा मोबाइल जप्त करायचा आहे. तसेच वैद्यकीय तपासणी करायची आहे. त्यामुळे १५ दिवसांची पोलीस कोठडी मागण्यात आली होती. पण न्यायालयाने १२ मार्चपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे. वकील वाजीद खान पुढे म्हणाले, “आरोपी दोन दिवस लपून राहिला कारण त्याला जीवाची भीती वाटत होती. हे प्रकरण माध्यमात मोठ्या प्रमाणात चालवले गेले. त्याचा फोटो माध्यमांत दाखवला गेला, त्यामुळे त्याच्या कुटुंबा समोर अडचणी उभ्या राहिल्या असून त्यांच्यासमोर उपासमारीचा प्रश्न आहे. त्यामुळे कुटुंबाच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी काहीतरी करायला हवे.”पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास बलात्कार झाला. बलात्कारानंतर हा आरोपी जवळपास तीन दिवस पोलिसांना चकवा देत होता. अखेर सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने पोलिसांनी आरोपीला गुणाट या गावातून मध्यरात्री अटक केली.

### पोलिसांनी काय सांगितले?

“एसटी स्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरा आणि स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर दीड ते दोन तासांत आम्ही आरोपीची ओळख पटवली होती. गेल्या दोन दिवसांपासून आम्ही आरोपीच्या गावात जावून शोधमोहिम घेत होतो. पण आरोपी तेव्हा सापडला नाही. अखेर तो आज सापडला आहे. याकरता मी गावातील नागरिकांचे धन्यवाद देतो. त्या गावात भेट देऊन नागरिकांचा सत्कार करणार आहोत. तिथे ज्या-ज्या लोकांनी मदत केली, त्यांचं विशेष अभिनंदन करणार आहोत”, असं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार भावना आरोपीच्या अटकेनंतर व्यक्त केली.

यानंतर आरोपीला आज पुणे सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दरम्यान या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी आरोपीला पुणे न्यायालयाने १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्वारगेट बसस्थानकात महिलेवर अत्याचार झाल्याची घटना उजेडात आल्यानंतर याविरोधात सर्व स्तरांमधून संताप व्यक्त केला जात होता. विरोधकांकडून राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनावर टीका केली जात होती. या दरम्यान आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले.शेवटच्या माहितीवरून आम्ही आरोपीला पकडलं. तो कोणालातरी दिसला आणि मग तो तिथून पळाला. ड्रोनच्या सहाय्याने जी दिशा दिसली, त्यातून त्याला अटक करण्यात आली. ज्याने शेवटची माहिती दिली, त्याला एक लाखांचं बक्षिस देण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त गावासाठी काय करता येणार, याचाही आम्ही विचार करणार आहोत”, असेही अमितेश कुमार यावेळी म्हणाले.

# वाहन उद्योगातील नवतंत्रज्ञान उलगडणार!

## ईव्ही टेक अत्याधुनिक मोटारी अन् दुचाकी चालविण्याचा अनुभव

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ईव्ही टेक इंडिया एक्स्पोचे आयोजन ७ ते ९ मार्चदरम्यान पिंपरीतील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनात वाहन उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक, उत्पादक, धोरणकर्ते आणि गुंतवणूकदार एकत्र येऊन इलेक्ट्रिक वाहन, बॅटरी तंत्रज्ञान आणि चार्जिंग पायाभूत सुविधांमधील नवकल्पना सादर करणार आहेत.**



ईव्ही टेक इंडिया एक्स्पोमध्ये १०० हून अधिक प्रदर्शक सहभागी होतील. तसेच १० हजारांहून व्यावसायिक आणि ई-वाहन उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहतील. यामध्ये देश-विदेशातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादक, सुट्या भागांचे पुरवठादार आणि चार्जिंग पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपन्या सहभागी होतील. पुढील पिढीच्या ऊर्जा कार्यक्षम मोबिलिटी सिस्टीम्सपर्यंत अनेक नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अनुभवण्याची संधी या प्रदर्शनाच्या माध्यमातून मिळेल.ग्लोब-टेक मीडियाच्या आयोजनाखाली होणाऱ्या या एक्स्पोला नॅशनल हायवेज फॉर इलेक्ट्रिक व्हेइकल्स, सोसायटी फॉर स्मार्ट ई-मोबिलिटी, टेस्टिंग इन्स्ट्रुमेंट्स इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांसारख्या प्रमुख औद्योगिक संस्थांचे सहकार्य लाभले आहे. या प्रदर्शनात ई-वाहनांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी देण्यासाठी एक विशेष टेस्ट ड्राईव्ह विभागही असेल. येथे अत्याधुनिक इलेक्ट्रिक मोटार आणि दुचाकी चालवून त्यांची कामगिरी, कार्यक्षमता यांचा अनुभव प्रत्यक्ष जाणून घेता येईल.ईव्ही टेक इंडिया एक्स्पो हे देशातील

### औद्योगिक संस्थांचे सहकार्य लाभले

आगामी काळात भारतीय ई-वाहन बाजारपेठ आणखी मोठ्या प्रमाणात विस्तारणार आहे, असेही यादव यांनी नमूद केले.ई-वाहन उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहतील. यामध्ये देश-विदेशातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादक, सुट्या भागांचे पुरवठादार आणि चार्जिंग पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपन्या सहभागी होतील. अँड इंडस्ट्री यांसारख्या प्रमुख औद्योगिक संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या भविष्यातील दिशादर्शनासाठी महत्त्वाचा मंच आहे. या वेगाने वाढणाऱ्या उद्योगात हा एक्स्पो शाश्वत वाहतूक उपायांना चालना देण्याची भूमिका बजावेल.

आम्ही उद्योजक, संशोधक आणि धोरणकर्त्यांना एकत्र आणून नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि सहयोगाच्या संधी निर्माण करण्यास कटिबद्ध आहोत, असे ईव्ही टेक इंडिया एक्स्पोचे प्रकल्प संचालक मुकेश यादव यांनी सांगितले.गेल्या काही वर्षांत भारतीय ईव्ही मार्केट वेगाने वाढत आहे. ई-वाहन विक्रीत २०२४ मध्ये २६.५ टक्के वाढ झाली असून, एकूण १९.४ लाख वाहनांची विक्री झाली. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे सरकारच्या अनुकूल प्रोत्साहन योजना, नवीन ईव्ही मॉडेल्सची वाढती संख्या आणि चार्जिंग पायाभूत सुविधांचा विस्तार हे आहे.

## पिंपरी-चिंचवडकरांचा अभिमान

# ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ चे पाद्यपूजन!

### तमाम शिव-शंभू प्रेमींच्या संकल्पाची अखेर पूर्तता; हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांची संकल्पना

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।





**शहरी आणि ग्रामीण संस्कृतीने नटलेल्या चार दिवसीय पवनाथडी जत्रेचा सोमवारी समारोप झाला. या जत्रेस नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावर्षी सुमारे ४ ते ५ लाख लोकांनी पवनाथडी जत्रेस भेट देऊन विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला, वस्तू खरेदी केल्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावली. तसेच सर्व सहभागी बचत गटांची सुमारे १.५ ते १.२५ कोटी रुपयांची उलाढाल या पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून झाली, अशी माहिती समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली.**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. राज्यातील शिव-शंभू प्रेमी युवकांचे प्रेरणास्थान म्हणून नावारुपाला येणाऱ्या या “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” चे पाद्यपूजन आज विधीवत करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे नेते तथा प्रखर हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी- मोशी येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा उभारण्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याच्या चौथऱ्याचे झाले आहे. त्यामुळे पुतळा ज्या ठिकाणी उभारला जणार आहे. त्या ठिकाणी पाद्यपूजन करण्यात आले.

> “ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा अर्थात ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’चे काम प्रगतीपथावर आहे. महाराजांच्या पुतळ्याचे पाद्यपूजन करण्यात आले. योगायोगाने आजपासूनच आपल्या राजाचा बलिदान मास सुरू होतो आहे. “देव-देश अन् धर्मासाठी मरावे कसे..?” याची शिकवण देणाऱ्या महाराजांचे कार्य अजरामर आहे. चंद्र-सूर्य असेपर्यंत या कार्याची महती कायम राहील. शंभूराजांच्या कार्याची प्रेरणा सदैव या शंभूसृष्टीमधून मिळेल.
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

यावेळी मोशी-बोऱ्हाडेवाडीतील ग्रामस्थ यांच्यासह शिव-शंभू विचारांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ अर्थातच छत्रपती संभाजी महाराज यांचा सर्वात उंच पुतळा उभारण्याचे भाग्य लाभले, याचे समाधान वाटते. पिंपरी-चिंचवडकरांसह संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटेल, असा भव्य पूर्णाकृती पुतळा साकारत आहे. शंभू सृष्टीसुद्धा आहे. हा पुतळा हिंदू धर्म आणि संस्कृती संरक्षणाची कायम प्रेरणा देत राहील.

#### ...असा आहे ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’

- छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची १४० फूट उंची
- चौथऱ्यांची उंची ४० फूट
- सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पुतळा १० फूट
- सरदार आणि मावळे एकूण १६ पुतळे प्रत्येकी १० फूट
- ओपन एअर थिएटर, प्रमुख प्रसंगांवर आधारित ब्राँझ म्यूरल्स
- शंभुराजांची गाथा ऐकण्यासाठी एलईडी स्क्रीन
- चलचित्र, प्रकाश योजना, हॉलोग्राफिक प्रेझेंटेशन व्यवस्था.

## राज्य शासनाचा १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्रस्थानी; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांचा सन्मान

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही सर्वोत्तम कामगिरी करणारी महापालिका ठरली आहे. राज्यभरातील महापालिकांचे आणि अन्य क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मध्यावधी (Mid Term) आढावा २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि वरिष्ठ राज्य व क्षेत्रीय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळे आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महानगरपालिका संचालनालयाने राज्यातील २२ महापालिकांपैकी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सहा महापालिकांची यासाठी निवड केली होती. त्यामध्ये अंतिम मूल्यमापनामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला असून ठाणे महानगरपालिकेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. ई-प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, नाविन्यपूर्ण कार्यक्रम आणि आधुनिक सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्याने महापालिकेला हे यश प्राप्त झाले आहे.


#### वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा..

महापालिकेने शहरातील २५ वाहतूक कोंडीच्या ठिकाणी सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी ९ ठिकाणी डेटा बेस ट्रॅफिक सिम्युलेशन आणि पीसीयू अँनेलिसीसच्या आधारे सुधारणा करण्यात आली आहे. याशिवाय इंजिनिअरिंगच्या दृष्टीने टर्निंग लेन, बस स्थानकांचे स्थानांतरण तसेच वाहनाचा वेग मर्यादित ठेवणारे उपायांवर भर देण्यात आला आहे.

#### डिजिटल प्रशासन आणि कामकाजामध्ये पारदर्शकता..

दिव्यांगांच्या सोयीसाठी महापालिकेने नव्याने संकेतस्थळ विकसित केले आहे. या संकेतस्थळामुळे रिअल टाईम अपडेट्स, १०० टक्के माहितीचा अधिकार (RTI) आणि नागरी सेवांमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यास मदत होत आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताजवळ नामाचे प्रेमच मागा

भगवंतापाशी मागणे करताना काय मागाल ? तुम्ही त्याच्याजवळ नामाचे प्रेमच मागा; दुसरे काही मागू नका. देवाजवळ मागणे मागताना चूक होऊ नये. एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना वर्षभर उत्तम रीतीने शिकविले, परीक्षेच्या वेळी परीक्षक कोणते प्रश्न विचारण्याचा संभव आहे हे सांगून, त्यांची उत्तरेही सांगून ठेवली; पण परीक्षक परीक्षा घ्यायला आला असता प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनीच द्यायची असतात. तिथे शिक्षक हजर असला, आणि विद्यार्थी उत्तर चुकीचे देतो आहे हे जरी त्याला दिसले, तरी तिथे त्याला काही बोलता येत नाही. तशी माझी स्थिती आहे. म्हणून मागणे मागण्याचे काम तुम्हालाच करायचे आहे. तेव्हा त्या वेळी चुकीने काही भलतेच मागू नका, एवढ्याचकरिता हा इशारा आहे.

कोणतीही परिस्थिती असली तरी त्यात भगवंताचे स्मरण ठेवावे, म्हणजे बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम मनावर कमी होतो. मनुष्यावर संकटे आली की तो घाबरतो. परंतु परमेश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांनी तरी असे करणे योग्य नाही. एखाद्या लहान मुलाच्या बापाने डोक्यावर पांघरूण घेऊन बागुलबुवा केला तर ते मूल भिते; पण पांघरूणाच्या आत आपला बापच आहे असे त्याला समजले की ते घाबरत नाही. त्याप्रमाणे, प्रत्येक व्यक्तीने आपल्या बाबतीत घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी परमेश्वराच्या किंवा आपल्या गुरूंच्या इच्छेने होतात ही जाणीव ठेवावी. म्हणजे त्याला भीती वा दुःख वाटणार नाही, तसेच चांगल्या गोष्टी घडल्या तरी त्याबाबत आनंदातिरेकही होणार नाही. याकरिता सदासर्वकाळ भगवंताचे चिंतन करावे. आपल्या विचाराने ठरल्याप्रमाणे झाल्याने सुखच मिळते असे नाही. काही वेळेस आपल्या विचाराच्या उलट होऊनही मागाहून तसे झाल्यानेच बरे वाटते. म्हणजे कोणत्याही गोष्टीचे सुखदुःख तात्काळ कळत नाही हेच खरे. म्हणून जरा वेळ थांबून सुख किंवा दुःख मानू या.

कर्ज फिटताना जसा आपल्याला आनंद होतो तसा देहभोग भोगताना आपल्याला आनंद झाला पाहिजे. प्रारब्ध टाळणे म्हणजे लोकांचे कर्ज बुडविणेच होय. आपला म्हणजे 'मी' पणाचा नाश आणि प्रारब्धाचा नाश, बरोबर होतो. "भगवंता, प्रारब्धाने आलेल्या दुःखाचा दोष तुझ्याकडे नाही. जर त्या दुःखामुळेच तुझे अनुसंधान टिकत असेल तर मला जन्मभर दुःखामध्येच ठेव." असे कुंतीने भगवंताजवळ मागितले. यातले मर्म ओळखून वागावे आणि काहीही करून अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न करावा.

**बोधवचन : भगवंताला अशी प्रार्थना करावी की, " देवा, प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत; पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नकोस.**

# काँग्रेसचं खरं नाही गड्या, राहुलजींच्या कोलांटउड्या!



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक



**एकेकाळी भारतातील प्रत्येक राज्यात आणि वर्षानुवर्ष केंद्रात सत्तेवर असलेला काँग्रेस पक्ष आज अक्षरशः गलितगात्र झाला आहे. राहुल गांधींसारख्या अपरिपक्व नेत्याकडे काँग्रेसचे नेतृत्व गेल्यामुळे या पक्षाच्या नशिबी पराभवांची मालिका येत आहे आणि हे नित्याचेच झाले आहे.**

### काँग्रेस बुडवण्याची प्रक्रिया..

नादान वक्तव्य आणि भूमिका, त्यामध्ये अभ्यास नसण्याचे कारण, चुकीचा सल्ला देणारी चौकडी आणि सर्वात महत्त्वाचे देशप्रेमाचा अभाव..यामुळे राहुल गांधी यांचे सर्वत्र हसे तर होत आहेच, पण स्वतः बुडण्याबरोबर ते काँग्रेसला सुद्धा बुडवत आहेत, हे नक्की!

### सरकारच्या प्रत्येक भूमिकेला विरोध

हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती.. लोकसभेतील विरोधी पक्षनेते असलेल्या राहुल गांधी यांनी 'डिसेंट नोट' दाखल करणार असल्याचे जाहीर केले. सरकारच्या कोणत्याही भूमिकेला विरोध करायचा एवढेच राहुल गांधी यांना माहीत असल्यामुळे एकूणच देशातील विरोधी पक्ष प्रत्येक वेळी हास्यास्पद ठरत आहे, एवढे नक्की!

### काँग्रेसचा कायद्यालाच विरोध

मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड करणाऱ्या तीन सदस्यांच्या समितीत मुख्य निवडणूक आयुक्त असण्याची तरतूद केंद्र सरकारने एक कायदा करुन काढून टाकली. स्वाभाविकच, न्यायसंस्था किंवा तेथील घटक यांना ते पटले नाही. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाने सरकारच्या कायद्याला आव्हान दिले आहे.

न्यायसंस्था आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्ष नवा नाही. अनेकदा न्यायाधीश अनाकलनीय निर्णय देतात आणि वागतात. या संदर्भात दिवंगत माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी दोन उदाहरणे दिली आहेत. त्यात एक न्यायमूर्ती वाहतूक कोंडीत अडकले आणि संतापून त्यांनी चौकात न्यायालय भरविले आणि आदेश जारी केले. आणखी एका न्यायाधिशाने रेल्वे रिझर्व्हेशन मिळाले नाही, म्हणून रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर न्यायालय भरविले होते. मुखर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांची निवड करण्यासाठी असलेली कॉलेजियम पद्धती कायम ठेवण्याचा जो हट्टाग्रह धरला, त्या बाबतीत देखील सडकून टीका त्यांच्या पुस्तकात केली आहे.

### बैठकीला राहुल गांधींची हजेरी

मुख्य निवडणूक आयुक्त निवडण्यासाठी नुकतीच जी बैठक झाली, त्याला राहुल गांधी हजर होते, पण पंतप्रधान आणि एक केंद्रीय मंत्री असे अन्य दोन सदस्य समितीत असल्यामुळे दोन जणांचे आपोआपच बहुमत झाले आणि ज्ञानेशकुमार यांची सेवाज्येष्ठता लक्षात घेऊन त्यांची त्या पदावर नियुक्ती करण्यात आली. रात्री राष्ट्रपतींकडून तसा अध्यादेश देखील जारी करण्यात आला.

### न्यायालयाच्या आदेशाला आव्हान द्या ना..

विषय असा आहे की न्यायालयात एखाद्या विषयावर सुनावणी होणार आहे, म्हणून केंद्र सरकार एक अधिकारी नियुक्त करण्याची प्रक्रिया पुढे कशी ढकलणार ? न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्यांना निर्णय आपल्या बाजूने लागावा, अशी अपेक्षा असते, हे खरे पण तो तसाच असेल असे मनाशी धरुन राजकीय पक्षांनी आपले डावपेच आखणे फसगत करुन घेण्यासारखे आहे. न्यायालयात कोणत्याही विषयावर तडकाफडकी निर्णय लागेल, असे काही म्हणता येत नाही शिवाय न्यायालयाने काही निर्णय दिला तरी त्या निर्णयाला आव्हान देण्याची सुविधा आपल्याकडे उपलब्ध आहे.

### वैफल्यामुळे काँग्रेसची पावले

विशेषतः काँग्रेस पक्षाचे सरकार अकरा वर्षांपूर्वी केंद्रातून पायउतार झाल्यानंतर आणि नजीकच्या काळात ते परत येईल, याची खात्री नसल्यामुळे काँग्रेस पक्षाकडून वैफल्यतेपोटी अशी पावले टाकली जातात. परिणामी आज तरी न्यायालये बरीच आक्रमक झालेली आहेत. दुर्दैवाने काही न्यायाधीशांची राजकीय मते न्याय देताना परावर्तित होतात. विशेषतः न्यायालयाने केलेली टिप्पणी हे मुख्यतः त्यांचे वैयक्तिक मत असते. त्या प्रकरणातील निर्णय आणि हे मत याचा परस्परसंबंध अजिबात नसतो.

### न्यायालयाने नाक खुपसणे

अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींनी लोकांना रोख पैसे सरकार देत असल्यामुळे लोक आळशी होत आहेत आणि त्यामुळे कामाला माणसे मिळत नाहीत, असे मत व्यक्त केले. यातील मूळ विषय बाजूला पडला आणि न्यायालयाने सरकारची खरडपट्टी काढली वगैरे बातम्या आल्या. परंतु, जनतेला काय सुविधा द्यायच्या याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार सरकारला असतो. अनेक न्यायालयांनी त्यांच्या निर्णयात हे नमूद केले आहे. म्हणजे जो कायदा न्यायालय रद्द करु शकत नाही त्या संदर्भात व्यक्त केलेल्या मतांना फारसा अर्थ नसतो.

मात्र देशातील विरोधी पक्षाची केंद्र सरकारच्या बाबतीत असलेली अत्यंत नकारात्मक आणि बरीचशी तिरस्काराची भूमिका यामुळे लोकप्रतिनिधींची बाजू आपोआपच कमकुवत होऊन त्याचा फायदा न्यायसंस्थेत बसलेल्या लोकांनी उठवला, तर नवल वाटायला नको. न्यायाधीश ही माणसेच असतात, हे लक्षात घेतले तर मला काय म्हणायचे आहे, हे लक्षात येईल. ज्यांच्या विरोधात न्यायालयात निर्णय जातो, त्यांचा न्यायालयावर असलेला विश्वास ढळणे शक्य असते, पण हल्ली राजकारणी बरीच विश्वासार्हता गमावून बसले आहेत. प्रशासन या विषयावर तर लोकांच्या मनात राग आहे. आता न्यायालयाच्या बाबतीत देखील भविष्यात भ्रमनिरास होऊ लागला तर लोकशाही व्यवस्थेसाठी ते दुःखदायक ठरेल एवढे नक्की..! म्हणून सरकार आणि विरोधी पक्ष असा समन्वय हवा. आज तरी तशी परिस्थिती दिसत नाही, त्याला कारणीभूत कोण? याचा विचार करायला हवा !

### विरोधकांचे सहकार्य हवे !

सत्ताधारी पक्षाला योग्य बाबतीत सहकार्य करावे अशी अपेक्षा विरोधकांकडून केली जाते. पण, ज्या पक्षाचे नेतृत्व राहुल गांधी यांच्याकडे आहे, त्यांच्याकडून मोठी अपेक्षा काय करणार ? अनेकदा अशा अपरिपक्व नेत्यांमुळे सरकारचे फावते, आणि भारतामध्ये असा विरोधी पक्ष नेता असणे, सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावर पडणारे आहे, हे निश्चित!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भास्कर जाधव यांचे बंधू शिंदे गटात!

## दापोलीच्या 14 नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

।परभणी।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अवघा कोकण शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली येत असल्याचं चित्र आहे. आज दापोलीच्या १४ नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. इतकंच नाही तर आमदार भास्कर जाधव यांचे बंधू बाळाशेठ जाधव यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी बोलताना माजी आमदार रामदास कदम म्हणाले की, आम्ही शिवसेनेत उठाव केला त्याला अनेक कारणे आहेत. आमदार आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनाही राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी केला, पण मी उद्धव ठाकरे यांना आज पुन्हा एकदा सांगतो, महाराष्ट्रातून त्यांना नाही उध्वस्त केल तर नाव रामदास कदम नाव लावणार नाही, असा घणाघात केला आहे.**



दापोली नगरपंचायतमधील ठाकरे गटातील नगरसेवक आणि शरद पवार गटातील नगरसेवक यांनी रामदास कदम आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम महिला आघाडीच्या श्रेया कदम यांच्या उपस्थितीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.रामदास कदम पुढे म्हणाले की, या जगातला कुठलाही पक्षप्रमुख असा नाही की आपल्याच आमदाराला संपवून टाकायचा इतका घाणेरडा विचार करेल, खालच्या पातळीचा विचार हा फक्त उद्धव ठाकरे यांनाच करता येऊ शकतो, अशी घणाघाती टीका रामदास कदम यांनी केली आहे. तीन वर्षांपूर्वीच उद्धव ठाकरे यांनी इथे दापोली, मंडणगडमध्ये काही सुभेदार पाठवले होते, व्यासपीठावरून सगळ्यांची हकालपट्टी केली, व्यासपीठावरूनच त्या सुभेदारांनी काही नियुक्ती केल्या असा आरोप त्यांनी केला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अशी नव्हती, अशीही टीका रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना अनिल परब यांनाही सुनावलं आहे.यावेळी योगेश कदम यांनी, बोलताना सांगितलं, की तीन वर्षांपूर्वी अनिल परब यांनी येथे येऊन घाणेरडे राजकारण केले होते. शिवसेनेची एक हाती सत्ता येत असताना त्यांनी परस्पर हात मिळवणी केली. मात्र आज या सगळ्याला शिवसेनेत प्रवेश करून या १४ नगरसेवकांनी उत्तर दिलं आहे. आता पुढच्या दोन वर्षात दापोलीचा विकास केला जाईल. दोन वर्षानंतर होणाऱ्या निवडणुकीचा निकाल आजच लागला आहे असं म्हटल्यास वावगे ठरणार नाही, अशा शब्दात पक्षप्रवेश केलेल्या नगरसेवकांचा त्यांनी गौरव केला. दापोली नगरपंचायतमध्ये यापुढे लवकरच शिवसेनेचा नगराध्यक्ष विराजमान होईल, असे सांगत विद्यमान ठाकरे गटाच्या नगराध्यक्ष ममता मोरे यांच्यावर अविश्वास ठराव आणण्याचे स्पष्ट संकेत योगेश कदम यांनी दिले आहेत.अवघा कोकण शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली येत असल्याचं चित्र आहे. आज दापोलीच्या १४ नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. इतकंच नाही तर आमदार भास्कर जाधव यांचे बंधू बाळाशेठ जाधव यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.आमदार आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनाही राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी केला, पण मी उद्धव ठाकरे यांना आज पुन्हा एकदा सांगतो, महाराष्ट्रातून त्यांना नाही उध्वस्त केल तर नाव रामदास कदम नाव लावणार नाही, असा घणाघात केला आहे.

### अविश्वास ठराव आणण्याचे संकेत

रामदास कदम आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम महिला आघाडीच्या श्रेया कदम यांच्या उपस्थितीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.रामदास कदम पुढे म्हणाले की, या जगातला कुठलाही पक्षप्रमुख असा नाही की आपल्याच आमदाराला संपवून टाकायचा इतका घाणेरडा विचार करेल, खालच्या पातळीचा विचार हा फक्त उद्धव ठाकरे यांनाच करता येऊ शकतो, अशी घणाघाती टीका रामदास कदम यांनी केली आहे. शिवसेनेचा नगराध्यक्ष विराजमान होई, न ठाकरे गटाच्या नगराध्यक्ष ममता मोरे यांच्यावर अविश्वास ठराव आणण्याचे स्पष्ट संकेत योगेश कदम यांनी दिले.

---

# शिवरायांचा महाराष्ट्र सुरक्षित राहिला पाहिजे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टोचले गृहमंत्र्यांचे कान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पुण्यात स्वारगेट बसस्थानक बलात्कार प्रकरणातील आरोपीला शिताफीने पकडण्यात आले आहे. त्याला योग्य ती शिक्षा होईलच; परंतु त्याच्यात ही विकृती आली कशी, याचा विचार केला पाहिजे. शिवराय, फुले-शाहू-आंबेडकरांच्या या महाराष्ट्रात महिला-भगिनी सुरक्षित राहिल्या पाहिजेत. पोलिसांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता कायद्यानुसार कर्तव्य बजावावे, अशा रोखठोक शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याचे गृहखाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे शुक्रवारी येथे कान टोचले.**




महायुती सरकारमध्ये दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या पक्षाच्या विस्ताराच्या निमित्ताने अजित पवार प्रथमच नांदेडमध्ये आले होते. नांदेड विमानतळावर त्यांचे आगमन झाल्यानंतर विमानतळ ते गुरूद्वारापर्यंत त्यांचे ठिकठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले. सहा वेगवेगळ्या ठिकाणी क्रेनच्या माध्यमातून त्यांना अतिभव्य पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर ओम गार्डन मंगल कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यामध्ये त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या सुमारे ३५ मिनिटांच्या भाषणात अजित पवार यांनी पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांसह प्रसिद्धीमाध्यमांनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. आपल्या बातम्यांमुळे आरोपी पकडण्यास मदत व्हावी, आरोपीला पळून जाण्याची संधी मिळू नये, असे वार्तांकन करण्याचा सल्ला त्यांनी माध्यमांना दिला. तर नेते व कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते म्हणाले, महाराष्ट्र हा नेहमीच सुसंस्कृत राहिला आहे. विरोधकांना देखील सन्मानाने वागवण्याची आपली परंपरा आहे. कालच मराठी भाषा दिन साजरा झाला. प्रत्येक मराठी माणूस विचाराने कोणीही असला तरी तो महाराष्ट्राच्या हिताचाच विचार करणार, याची खूणगाठ प्रत्येकाने कायम मनाशी बांधली पाहिजे.३ मार्च रोजी विधीमंडळाचे अधिवेशन सुरु होते आहे. यात दि. १० रोजी अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. विरोधक लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करीत आहेत., असे निसंदिग्धपणे सांगून पवार म्हणाले की, जे लोक आपल्या उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजा भागवू शकत नाहीत, त्यांच्या मदतीसाठी सरकारचे प्रयोजन असते आणि सरकार आपले कर्तव्य चोखपणे बजावेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी गरजू समाज घटकांसाठी असंख्य योजना राबवत आहेत. कोट्यवधी लोकांना घरकुल देण्यात आले.

### मराठवाडा तहानलेला राहणार नाही

तरुणांना रोजगार देणाऱ्या अनेक योजना आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र सरकार काम करत आहे.बाभळी बंधारा बांधताना अडचणी येत होत्या. परंतु लोकांचे हित लक्षात घेऊन आपण पुढाकार घेत तो मार्गी लावला. यापुढेही मराठवाड्याला पाण्याची कमतरता भासणार नाही, यासाठी आपले प्रयत्न असतील.

# बद्रीनाथ मंदिराजवळ भीषण दुर्घटना!

## हिमस्खलनामुळे 57 कामगार गाडले गेले; 16 वाचवण्यात यश

| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उत्तराखंडच्या काही भागांत सुरू असलेल्या बर्फवृष्टी दरम्यान ही दुःखद घटना घडली आहे. वृत्तानुसार, चमोली येथील बद्रीनाथ धाम येथील माना गावाजवळील हिमनदीखाली गाडलेल्या ५७ कामगारांपैकी १६ कामगारांना वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे.**



उत्तराखंडच्या मुख्य सचिव राधा रतुरी यांनी सांगितले की,"चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खल झाल्यामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत."हे सर्व कामगार बीआरओशी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. चमोलीच्या काही भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर महामार्गाजवळ हा अपघात झाला.उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनीही या अपघातावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. "चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ बीआरओकडून सुरू असलेल्या बांधकामादरम्यान अनेक कामगार हिमस्खलनाखाली दबल्याची दुःखद बातमी कळाली. आयटीबीपी, बीआरओ आणि इतर बचाव पथकांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. सर्व कामगार बांधवांच्या सुरक्षेसाठी मी भगवान बद्री विशालकडे प्रार्थना करतो", असे मुख्यमंत्री धामी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले. पोलीस मुख्यालयाचे प्रवक्ते आयजी नीलेश आनंद यांनी दुजोरा दिला की, हिमस्खलनात अडकलेल्या ५७ कामगारांपैकी १० जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मानाजवळील लष्करी छावणीत दाखल करण्यात आले आहे.या अपघातानंतर बचाव कार्यात तीन ते चार रुग्णवाहिका देखील सहभागी झाल्या आहेत. बचाव पथके हिमस्खलनाच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जोरदार हिमवृष्टीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहचण्यात अडथळे येत आहेत.

चमोलीचे संदीप तिवारी म्हणाले की,"मुसळधार बर्फवृष्टीमुळे तिथे हेलिकॉप्टर सेवा वापरता येत नाही. संवाद साधण्यासाठी सॅटेलाइट फोन किंवा इतर उपकरणेही नाहीत."उत्तराखंडमध्ये चार धाम यात्रेची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. आता ही दुर्घटना बद्रीनाथच्या अगदी जवळ घडली असल्याने, बर्फ हटवण्याचे काम खुप वेगाने केले जात आहे, रस्ता वेळेत मोकळा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याचबरोबर गेल्या दोन दिवसांपासून डोंगराळ भागात हवामान खूपच खराब आहे. उत्तराखंडसह, हिमाचल

### चार धाम यात्रेची घोषणा

या अपघातानंतर बचाव कार्यात तीन ते चार रुग्णवाहिका देखील सहभागी झाल्या आहेत. बचाव पथके हिमस्खलनाच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जोरदार हिमवृष्टीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहचण्यात अडथळे येत आहेत. चमोलीचे संदीप तिवारी म्हणाले की, "मुसळधार बर्फवृष्टीमुळे तिथे हेलिकॉप्टर सेवा वापरता येत नाही.

प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊस पडला आहे, नद्या दुथडी भरून वाहत आहेत. अनेक वाहनेही वाहून गेली आहेत. उत्तराखंडच्या मुख्य सचिव राधा रतुरी यांनी सांगितले की,"चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खल झाल्यामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत."हे सर्व कामगार बीआरओशी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. चमोलीच्या काही भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर महामार्गाजवळ हा अपघात झाला.उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनीही या अपघातावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. "चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ बीआरओकडून सुरू असलेल्या बांधकामादरम्यान अनेक कामगार हिमस्खलनाखाली दबल्याची दुःखद बातमी कळाली. आयटीबीपी, बीआरओ आणि इतर बचाव पथकांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. सर्व कामगार बांधवांच्या सुरक्षेसाठी मी भगवान बद्री विशालकडे प्रार्थना करतो", असे मुख्यमंत्री धामी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले. पोलीस मुख्यालयाचे प्रवक्ते आयजी नीलेश आनंद यांनी दुजोरा दिला की, हिमस्खलनात अडकलेल्या ५७ कामगारांपैकी १० जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मानाजवळील लष्करी छावणीत दाखल करण्यात आले आहे.

# ट्रम्प प्रशासनाला न्यायालयाकडून धक्का!

## सरकारी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याच्या निर्णयाला स्थगिती

| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या सरकारी कर्मचारी संख्या कमी करण्याच्या प्रयत्नांना मोठा कायदेशीर धक्का बसला आहे. न्यायाधीशांनी गुरुवारी ऑफिस ऑफ परसोनल मॅनेजमेंट (OPM) ला अनेक सरकारी संस्थांमधील प्रोबेशनरी कर्मचाऱ्यांना नोकरीतून काढून टाकण्याचे निर्देश रद्द करण्याचे आदेश दिले. अमेरिकन जिल्हा न्यायाधीश विल्यम अलसुप यांनी हा निर्णय कामगार संघटनांच्या युक्तिवादानंतर दिला आहे.**




इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.न्यायाधीश अलसुप यांच्या निर्णयामुळे ओपीएमच्या कृती थांबल्या आहेत. ज्यांनी संरक्षण विभाग, राष्ट्रीय उद्यान सेवा, भू व्यवस्थापन ब्युरो आणि राष्ट्रीय विज्ञान फाउंडेशन यासारख्या एजन्सींमधील कामगारांना लक्ष्य केले होते. फेब्रुवारीच्या मध्यात जारी केलेल्या ओपीएमच्या निर्देशानुसार, एजन्सींना प्रोबेशनरी कर्मचाऱ्यांना जे त्यांच्या नोकरीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षात आहेत त्यांना कामावरून काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले होते. या निर्णयामुळे हजारो कामगार बेरोजगार होणार आहेत, असं कामगार संघटनांनी म्हटंल होतं."काँग्रेसने स्वतः एजन्सींना कामावर ठेवण्याचा आणि काढून टाकण्याचा अधिकार दिला आहे", न्यायाधीश अलसुप यांनी खंडपीठाकडून सांगितले. "विश्वाच्या इतिहासात कोणत्याही कायद्यानुसार OPM कार्यालयाला दुसऱ्या एजन्सीमध्ये कर्मचाऱ्यांना कामावर ठेवण्याचा आणि काढून टाकण्याचा कोणताही अधिकार नाही."हा निर्णय राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याच्या प्रयत्नांना सर्वात महत्त्वाचे कायदेशीर आव्हान आहे. जो त्यांच्या प्रशासनाच्या अजेंडाचा एक महत्त्वाचा घटक आहे. ८ लाख सरकारी कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या अमेरिकन फेडरेशन ऑफ गव्हर्नमेंट एम्प्लॉईजच्या नेतृत्वाखालील युनियन गटांनी सरकारवर खटला दाखल

### हजारो कामगार बेरोजगार

कामावरून काढून टाकलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरीबाबत बक्षिस मिळालं होतं आणि त्यांच्या पर्यवेक्षकांकडून माहिती न घेता त्यांना काढून टाकण्यात आले होते, असाही युक्तीवाद करण्यात आला. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या सरकारी कर्मचारी संख्या कमी करण्याच्या प्रयत्नांना मोठा कायदेशीर धक्का बसला आहे.

केला आणि प्रशासनावर अमेरिकेच्या इतिहासातील रोजगार फसवणुकीच्या सर्वात मोठ्या घटनांपैकी एक घडवून आणल्याचा आरोप केला. ट्रम्प प्रशासनाने प्रोबेशनरी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यासाठी OPM चा वापर केला आहे. हजारो कर्मचाऱ्यांना आधीच खराब कामगिरीचे खोटे कारण सांगून त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे, असं कामगार संघटनांचं म्हणणं आहे."या देशाच्या रोजगार कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या सरकारी यंत्रणा OPM ने एकाच वेळी या देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी रोजगार फसवणूक केली आहे", असे युनियन वकिलांनी न्यायालयीन फाइलिंगमध्ये लिहिले.


# रवीना टंडनच्या लेकीचं दत्तक बहिणींबद्दल वक्तव्य

९० च्या दशकात अनेक सुपरहिट चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी अभिनेत्री म्हणजे रवीना टंडन होय. रवीना अवघी २१ वर्षांची असताना तिने दोन मुली दत्तक घेतल्याने तिच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला होता, तर काहींनी मात्र नकारात्मक टिप्पण्या केल्या होत्या. रवीनाच्या या मुली आता मोठ्या झाल्या आहेत, तसेच तिची स्वतःची मुलं राशा व रणबीरही मोठी झाली आहे. राशाने दत्तक बहिणींबद्दल वक्तव्य केलं आहे, ती काय म्हणाली? जाणून घेऊयात.रवीना टंडन फक्त २१ वर्षांची होती, जेव्हा तिने पूजा व छाया या मुलींना दत्तक घेतलं होतं. त्यानंतर काही वर्षांनी तिने २००४ मध्ये अनिल थडानीशी लग्न केलं. अनिल व रवीनाला राशा व रणबीर ही दोन अपत्ये झाली. रवीना एकदा म्हणाली होती की पूजा व छाया रणबीर आणि राशा यांच्यासाठी मोठ्या बहिणी आहेत. आता राशाने एका मुलाखतीत दोन्ही दत्तक बहिणींबरोबरच्या नात्याबद्दल भाष्य केलं. चार भावंड जेव्हा एकत्र असतो तेव्हा दोन टीम होतात. ज्यात छाया आणि रणबीर एका बाजूला असतात आणि पूजा व राशा दुसऱ्या टीममध्ये असतात, असं राशाने सांगितलं.राशा फेमिनाला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली की ती चार भावंड एकत्र असतात तेव्हा खूप वेडेपणा करतात. "फक्त आणि फक्त वेडेपणा. छाया दीदी आणि रणबीर कदाचित थोडे शांत आहेत.

# अमिताभ बच्चन यांनी ती पोस्ट नेमकी का केली

महानायक अमिताभ बच्चन सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते अनेकदा सोशल मीडियावर पोस्ट करत असतात. त्यांनी ७ फेब्रुवारी रोजी एक पोस्ट केली होती. तीन शब्दांची त्यांची पोस्ट पाहून चाहते काळजीत पडले होते. अमिताभ बच्चन यांनी ती पोस्ट नेमकी का केली होती, याचा खुलासा त्यांनी स्वतःच केला आहे. अमिताभ बच्चन सोशल मीडियावर त्यांच्या वैयक्तिक आयुष्यासोबतच व्यावसायिक आयुष्याशी संबंधित गोष्टी चाहत्यांशी शेअर करत असतात. ते अनेकदा त्यांच्या एक्स अकाउंटवर अशा पोस्ट करतात ज्या खूप व्हायरल होतात.बिग बींनी ७ फेब्रुवारीला अशीच एक पोस्ट केली होती. त्यात "जाण्याची वेळ झाली..." असं त्यांनी लिहिलं होतं. त्यांची ही पोस्ट पाहून चाहत्यांची चिंता वाढली होती. आता त्यांनी ही पोस्ट का केली होती, याबद्दल मौन सोडले आहे.अमिताभ बच्चन ८२ वर्षांचे असून या वयातही ते काम करत आहेत. चित्रपट असो किंवा शो, ते उत्साहाने शूटिंग करताना दिसतात. अचानक त्यांनी 'जाण्याची वेळ झाली' अशी पोस्ट केल्याने नेमकं काय घडलंय, ते कशाबद्दल बोलत आहेत अशी चर्चा सुरू झाली. बिग बी चित्रपट आणि 'कौन बनेगा करोडपती'मधून निवृत्ती घेत आहेत की त्यांची तब्येत ठीक नाही, असे एक ना अनेक प्रश्न लोकांना पडले होते. आता 'कौन बनेगा करोडपती 16' चा एक नवीन प्रोमो समोर आला आहे. या प्रोमोमध्ये अमिताभ बच्चन त्या पोस्टबद्दल बोलताना दिसत आहेत. शोमधील अनेक लोक त्यांना अनेक प्रश्न विचारतात.

# किआरा आई होणार



'कबीर सिंग'मधील प्रीती अर्थात कियारा अडवाणी आई होणार आहे. सिद्धार्थ मल्होत्रा व कियारा अडवाणी यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करून ही आनंदाची बातमी दिली आहे. लग्नानंतर दोन वर्षांनी हे दोघेही आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत करणार आहेत. कियारा व सिद्धार्थ यांच्या लग्नाला ७ फेब्रुवारीला दोन वर्षे झाली. आता त्यांच्या आयुष्यात नवीन सदस्य येणार आहे. कियारा व सिद्धार्थ यांनी एक फोटो शेअर करून ही गुड न्यूज शेअर केली आहे. दोघांनी हातात बाळाच्या मोचे पकडलेला एक फोटो पोस्ट केला आहे. त्या फोटोबरोबर एक क्युट कॅप्शन देत त्यांनी ही बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे."आमच्या आयुष्यातील सर्वात मोठे गिफ्ट... लवकरच येत आहे," असं कॅप्शन कियाराने या फोटोला दिलं आहे. कियाराने हा फोटो पोस्ट केल्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.कियारा व सिद्धार्थ यांनी 'शेरशाह' चित्रपटात एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान कियारा व सिद्धार्थ यांच्यातील जवळीक वाढली आणि ते खऱ्या आयुष्यात प्रेमात पडले. त्यानंतर ते एकमेकांना डेट करू लागले. काही वर्षे डेट केल्यावर दोघांनी ७ फेब्रुवारी २०२३ रोजी राजस्थानमध्ये जैसलमेर येथे सूर्यगढ पॅलेसमध्ये मोठ्या थाटामाटात लग्न केलं होतं. लग्नाचा दुसरा वाढदिवस सेलिब्रेट केल्यानंतर काही दिवसांनी आता त्यांनी आई-बाबा होणार असल्याची बातमी शेअर केली आहे. सिद्धार्थ व कियारा दोघांचेही चाहते व सिनेविश्वातील सेलिब्रिटी अभिनंदन करत आहेत.वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास तर कियारा लवकरच रणवीर सिंहबरोबर 'डॉन ३' मध्ये दिसणार आहे.

# मराठमोळ्या दिग्दर्शकाच्या घरी लगीनघाई



बॉलीवूडमध्ये लगीनघाई सुरू आहे. नुकताच रणबीर कपूर, करीना कपूर यांच्या आत्याचा मुलगा व अभिनेता आदर जैन गर्लफ्रेंड अलेखा अडवाणीबरोबर लग्न बंधनात अडकला. आता एका मराठमोळ्या दिग्दर्शकाच्या मुलाच्या लग्नाची तयारी सुरू आहे. 'जोधा अकबर'सह अनेक सुपरहिट बॉलीवूड चित्रपटांचे मराठमोळे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांचा मोठा मुलगा लवकरच गर्लफ्रेंडशी लग्न करणार आहे. आशुतोष व सुनीता गोवारीकर यांचा मुलगा कोणार्क गोवारीकर २ मार्च रोजी लग्नबंधनात अडकणार आहे. कोणार्क नामांकित रिअल इस्टेट डेव्हलपर रसेश बाबुभाई कनकिया यांची कन्या नियती कनकियाशी लग्न करणार आहे. कोणार्क व नियती यांच्या लग्नाचा सोहळ्या भव्यदिव्य असेल. या लग्नात सेलिब्रिटींसह उद्योगविश्वातील नामांकित उद्योगपती हजेरी लावतील. तसेच या कोणार्क व नियती दोघांचे कुटुंबीय, नातेवाईक व मित्र-मैत्रिणी या लग्नात उपस्थित राहणार आहेत.कोणार्क गोवारीकरबद्दल बोलायचं झाल्यास तो त्याच्या वडिलांबरोबर काम करतोय आणि चित्रपट निर्मितीचे बारकावे शिकत आहे. तो त्याच्या वडिलांप्रमाणेच चित्रपट उद्योगात काम करण्यास उत्सुक आहे. आशुतोष व सुनीता गोवारीकर यांना दोन मुलं आहेत. कोणार्क हा थोरला मुलगा असून धाकट्या मुलाचे नाव विश्वांग गोवारीकर आहे.आशुतोष गोवारीकर यांनी दिग्दर्शनाबरोबरच अभिनयातही पाऊल ठेवलं आहे. ते शेवटचे 'मानवत मर्डर्स'मध्ये झळकले होते. त्याचबरोबर 'काला पानी' या वेब सीरिजमध्येही त्यांनी मोठी व महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या शेवटच्या सिनेमाबद्दल बोलायचं झाल्यास तो 'पानीपत' होता. या चित्रपटात अर्जुन कपूर, क्रिती सेनॉन, संजय दत्त हे कलाकार होते. २०१९ साली आलेला हा ऐतिहासिक चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. आशुतोष गोवारीकर यांनी आतापर्यंत 'लगान', 'स्वदेस', 'जोधा अकबर', 'मोहेंजोदारो', 'बाजी', 'पानीपत' असे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. यापैकी बहुतांशी चित्रपट सुपरहिट ठरले होते. आशुतोष गोवारीकर त्यांच्या भव्यदिव्य चित्रपटांसाठी ओळखले जातात.

# कंगना - जावेद अख्तर यांच्यातील वाद मिटला



बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत व दिग्गज लेखक जावेद अख्तर यांच्यातील अनेक वर्षांपासून सुरू असलेला कायदेशीर खटला अखेर संपला आहे. दोघांनी हे कायदेशीर प्रकरण सोडवले आहे. कंगनाने सोशल मीडियावर जावेद अख्तर यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर करून चाहत्यांना याची माहिती दिली आहे. शुक्रवारी, दोघे मुंबईतील वांद्रे येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर राहिले आणि त्यांनी पाच वर्षे जुना वाद सोडवला. जावेद अख्तर आणि कंगना रणौत २८ फेब्रुवारीला सकाळी १०.३० वाजता त्यांच्या वकिलांसह वांद्रे कोर्टात पोहोचले. तिथे त्यांनी मॅजिस्ट्रेट आशिष आवारी यांच्यासमोर पाच वर्षे जुनं कायदेशीर प्रकरण संपवलं.कंगनाने इंस्टाग्राम स्टोरीवर जावेद अख्तर यांच्याबरोबर एक फोटो शेअर केला आणि लिहिलं, "आज, जावेद जी आणि मी मध्यस्थीद्वारे आमचे कायदेशीर प्रकरण (मानहानी प्रकरण) सोडवले आहे. जावेद जी यांनी मोठं मन ठेवून हे प्रकरण सोडवले. तसेच मी दिग्दर्शन करत असलेल्या माझ्या पुढच्या चित्रपटासाठी गाणी लिहिण्यासही त्यांनी होकार दिला आहे."कंगना रनौत व जावेद अख्तर यांच्यातील ही कायदेशीर लढाई २०२० मध्ये सुरू झाली होती. कंगनाने एका मुलाखतीत २०१६ मध्ये जावेद अख्तर यांच्याबरोबर झालेल्या भेटीची आठवण सांगितली होती. कंगना आणि हृतिक रोशनचे २०१६ मध्ये ब्रेकअप झाले होते, ज्यामुळे दोघांमध्ये बराच वाद झाला होता. रोशन कुटुंबाच्या जवळ असलेल्या जावेद अख्तर यांनी हृतिक रोशनची माफी मागण्यास सांगितलं होतं, असा दावा कंगनाने केला होता.२०२१ मध्ये एका मुलाखतीत कंगना म्हणाली होती की, २०१६ मध्ये झालेली बैठक त्यांना अपमानजनक वाटली. त्यामुळेच त्यांनी तिच्याविरुद्ध मानहानीचा दावा करीत न्यायालयात धाव घेतली आहे. कंगना रणौतनेदेखील जावेद अख्तर यांच्याविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला होता. मात्र, अख्तर यांच्यावरील कारवाईला दिंडोशी सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती.

# ऑस्ट्रेलियाचा संघ उपांत्य फेरीत!

## अफगाणिस्तान -ऑस्ट्रेलिया सामना पावसामुळे झाला रद्द

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलच्या दृष्टीने अफगाणिस्तान-ऑस्ट्रेलिया सामना खूप महत्त्वाचा होता. या सामन्याचा विजेता संघ ब गटातून चॅम्पियन्स ट्रॉफी उपांत्य फेरीत जाणारा पहिला संघ ठरणार होता. पण अफगाणिस्तानची फलंदाजी झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या डावात १२ षटके होताच पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे सामना रद्द करण्यात आला.**




अफगाणिस्तान ऑस्ट्रेलियाचा सामना पाऊस पडल्याने रद्द करण्यात आला. पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर बराच वेळ थांबून मैदान सामन्यासाठी पुन्हा तयार होते की नाही, याचे पंचांनी निरिक्षण केले. पण लाहोरच्या या मैदानावर प्रचंड पाणी असल्याने सामना रद्द करण्यात आला. भारतीय वेळेनुसार रात्री ९.२० वाजता पंचांनी सामना रद्द केल्याची घोषणा केली. या निकालाचा अर्थ ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. त्याचवेळी अफगाणिस्तान संघ अजूनही उपांत्य फेरीत पोहोचू शकतो.ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पोहोचला असला तरी अफगाणिस्तानची उपांत्य फेरी गाठण्याची शक्यता अजूनही कायम आहे. सामना पावसामुळे रद्द झाल्याने दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला. ऑस्ट्रेलिया सर्वाधिक ४ गुणांसह पात्र ठरली, तर अफगाणिस्तानचा संघ ३ गुण तर दक्षिण आफ्रिकेचा संघही ३ गुणांसह शर्यतीत आहे. त्यामुळे आता अफगाण संघाला आता उद्या म्हणजेच १ मार्च २०२५ रोजी इंग्लंडने विजय मिळवावा अशी अपेक्षा असेल, जेणेकरून दक्षिण आफ्रिकेचा रन रेट कमी होईल आणि टेम्बा बावुमाचा संघ तिसऱ्या स्थानावर घसरेल.तत्पूर्वी, पावसामुळे सामना थांबवण्यात आला तेव्हा ऑस्ट्रेलियाने २७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १२.५ षटकात १ बाद १०९ धावा केल्या होत्या. ट्रॅव्हिस हेड जबरदस्त फॉर्मात होता. त्याने ४० चेंडूत ९ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ५९ धावा केल्या होत्या. अफगाणिस्तान संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.ऑस्ट्रेलियाने सामन्यात दणक्यात सुरुवात केली, पण अफगाणिस्तानने हार मानली नाही आणि शेवटपर्यंत उत्कृष्ट फलंदाजी करत २७३ धावांची सन्मानजनक धावसंख्या उभारली. सदिकउल्ला अटलने ९५ चेंडूत ३ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर संघाचा अष्टपैलू खेळाडू अजमतुल्ला ओमरझाईने वादळी खेळी केली आणि संघाची धावसंख्या २५० पार नेऊन ठेवली. ओमरझाईने ६३ चेंडूत ५ षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने ६७ धावा केल्या.

### इंग्लंड स्पर्धेतून बाहेर पडला

ब गटात अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका अजूनही उपांत्य फेरीच्या शर्यतीत आहेत, तर बुधवारी २६ फेब्रुवारी रोजी अफगाणिस्तानकडून पराभूत होऊन इंग्लंड स्पर्धेतून बाहेर पडला. यामुळे त्यांचा कर्णधार जोस बटलरने शुक्रवारी २८ फेब्रुवारी २०२५ रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या स्पर्धेच्या अंतिम सामन्याच्या एक दिवस आधी कर्णधारपदाचा राजीनामा दिला.अफगाणिस्तान ऑस्ट्रेलियाचा सामना पाऊस पडल्याने रद्द करण्यात आला. पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर बराच वेळ थांबून मैदान सामन्यासाठी पुन्हा तयार होते की नाही, याचे पंचांनी निरिक्षण केले. पण लाहोरच्या या मैदानावर प्रचंड पाणी असल्याने सामना रद्द करण्यात आला. भारतीय वेळेनुसार रात्री ९.२० वाजता पंचांनी सामना रद्द केल्याची घोषणा केली. या निकालाचा अर्थ ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला.

# दिल्लीचा मुंबई इंडियन्सवर मोठा विजय

## मुंबई इंडियन्सच हिसकावले गुणतालिकेतील पहिलं स्थान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वुमन्स प्रीमियर लीग २०२५ महत्त्वपूर्ण वळणावर आहे. यादरम्यान दिल्ली कॅपिटल्स संघाने चॅम्पियन मुंबई इंडियन्सवर मोठा विजय मिळवला आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने मुंबई इंडियन्सवर ५ षटकं आणि ३ चेंडू राखून शानदार विजय नोंदवला आहे.दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने मुंबई इंडियन्सकडून गुणतालिकेतील पहिलं स्थान हिसकावून घेतलं आहे.**



मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना अवघ्या १२३ धावा केल्या. मुंबईचा संघ आजच्या सामन्यात गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्हीमध्ये अपयशी ठरला. सुरूवातीला संघातील फलंदाज फेल ठरले, तर नंतर गोलंदाजांना सामना संपेपर्यंत फक्त १ विकेट घेण्यात यश मिळाले. दिल्ली कॅपिटल्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि संघातील गोलंदाजांनी हा निर्णय अगदी योग्य असल्याचे सिद्ध केले. मुंबईकजून यस्तिका भाटिया आणि मॅथ्यूजने चांगली सुरूवात केली होती. पण ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठू शकला नाही. यस्तिका भाटिया ११ धावा तर हिली मॅथ्यूज २२ धावा करत बाद झाली.तुफानी फॉर्मात असलेली नॅट स्किव्हर ब्रंट १८ धावा करत स्वस्तात परतली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरदेखील २२ धावा करत बाद झाली. यानंतर अमनजोत कौर आणि अमेलिया केरने प्रत्येकी १७ धावा करत संघाला १०० धावांचा टप्पा गाठून दिला आणि मुंबईने १२३ धावा केल्या. दिल्लीकडून जेस जोनासनने आणि मिन्नू मनी आणि ३-३ विकेट्स घेत मुंबईचे कंबरडे मोडले. यांतर शिखा पांडे आणि एनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.प्रत्युत्तरात दिल्लीने वादळी सुरूवात केली. मुंबईने दिलेल्या १२४ धावांचे लक्ष्य दिल्लीने १ विकेट गमावत १४.३ षटकांत पूर्ण केले. मेग लॅनिंग आणि शफाली वर्मा यांनी अर्धशतकी भागीदारी करत एक चांगली सुरूवात करून दिली. शफाली वर्मा २८ चेंडूत ३ षटकार आणि ४ चौकारांसह ४३ धावांची खेळी केली. लॅनिंगने ४९ चेंडूत ९ चौकारांसह नाबाद ६० धावा केल्या. तर जेमिमा रोड्रिग्जने १५ धावांची खेळी करत कर्णधाराला चांगली साथ दिली.

### मुंबईचे कंबरडे मोडले

मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना अवघ्या १२३ धावा केल्या. मुंबईचा संघ आजच्या सामन्यात गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्हीमध्ये अपयशी ठरला. सुरूवातीला संघातील फलंदाज फेल ठरले, तर नंतर गोलंदाजांना सामना संपेपर्यंत फक्त १ विकेट घेण्यात यश मिळाले.दिल्ली कॅपिटल्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि संघातील गोलंदाजांनी हा निर्णय अगदी योग्य असल्याचे सिद्ध केले. मुंबईकजून यस्तिका भाटिया आणि मॅथ्यूजने चांगली सुरूवात केली होती. पण ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठू शकला नाही. यस्तिका भाटिया ११ धावा तर हिली मॅथ्यूज २२ धावा करत बाद झाली.तुफानी फॉर्मात असलेली नॅट स्किव्हर ब्रंट १८ धावा करत स्वस्तात परतली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरदेखील २२ धावा करत बाद झाली. यानंतर अमनजोत कौर आणि अमेलिया केरने प्रत्येकी १७ धावा करत संघाला १०० धावांचा टप्पा गाठून दिला आणि मुंबईने १२३ धावा केल्या. दिल्लीकडून जेस जोनासनने आणि मिन्नू मनी आणि ३-३ विकेट्स घेत मुंबईचे कंबरडे मोडले. यांतर शिखा पांडे आणि एनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.प्रत्युत्तरात दिल्लीने वादळी सुरूवात केली. मुंबईने दिलेल्या १२४ धावांचे लक्ष्य दिल्लीने १ विकेट गमावत १४.३ षटकांत पूर्ण केले.

महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
। दि. 1 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# क्षेत्र कोणतेही असो व्यवस्थापन महत्त्वाचे : सोनाली कुलकर्णी

## शिक्षण विश्व : एस. बी. पाटील मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या ‘युवोत्सव – 2025’चे उद्घाटन

। पिंपरी-चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तुम्ही कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असाल; पण यशस्वी होण्यासाठी व्यवस्थापन हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. आपल्या कार्याचे व्यवस्थापन कसे केले पाहिजे; याची माहिती असली पाहिजे. जबाबदारीने व्यवस्थापन केले तर आपण आपल्या क्षेत्रात नक्कीच यशस्वी होऊ शकतो, असे मत अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी व्यक्त केले.**



पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित ‘युवोत्सव २०२५’ या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन गुरूवारी (दि.२७ फेब्रुवारी) सोनाली कुलकर्णी आणि पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आर. जे. अक्षय, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एसबीपीएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर आदी उपस्थित होते. युवोत्सव स्पर्धेचे हे दहावे वर्ष असून यामध्ये फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बॉक्स क्रिकेट या स्पर्धा होणार आहेत. युवोत्सव क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे परिसरातील पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयामधील संघ सहभागी झाले आहेत. विजयी संघांना आकर्षक बक्षिसे व रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत, असे डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.

शासकीय, सामाजिक, शैक्षणिक अथवा युवोत्सव सारखे उपक्रम लोक सहभागातूनच यशस्वी होतात. त्यांना मान्यता प्राप्त होते. हे युवोत्सव स्पर्धेच्या निमित्ताने दिसून येते. पिंपरी चिंचवड शहराला औद्योगिक नगरी बरोबरच सांस्कृतिक, क्रीडा नगरी अशीही ओळख निर्माण झाली आहे.

महापालिकेने अनेक क्रीडांगणे विकसित केली आहेत. यामध्ये विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्रयत्न करत आहे, असे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोक सहभाग आवश्यक आहे असे प्रदिप जांभळे पाटील म्हणाले.



Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!